| MHKO050019902022 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक २११/२०२२ मधील निशाणी ३० वरील आदेश तानाजी लक्ष्मण हलसवडे विरुध्द गोविंद लक्ष्मण हलसवडे व इतर** |
|---|---|

प्रस्तुत प्रतिवादी क्र.३ तर्फे अर्ज असा की, सदर कामाची नेमली तारीख आज रोजी आहे. यातील प्रतिवादी यांना कैफियत व म्हणणे देण्यास १ दिवसाचा विलंब झालेला आहे. सदर कामी यातील प्रतिवादी यांनी म्हणणे व कैफियत देण्यास जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सदर कामी यातील प्रतिवादी यांना मुदतीत आवश्यक माहिती व नकला मिळाली नसल्याने त्यांना मूदतीत हजर राहून म्हणणे देता आले नाही. तरी सदर कामी यातील प्रतिवादी यांना झालेला १ दिवसांचा विलंब रद्द होवून यातील प्रतिवादी यांचे म्हणणे व कैफियत हजर करणेस परवानी व्हावी व सदरचा अर्ज मंजूर व्हावा अशी त्यांनी विनंती केली.

२. सदर अर्जावर वादी यांनी असे म्हणणे दाखल केले आहे की, सदरचा अर्ज हा प्रतिवादी यांनी कोणतीही योग्य असे कारण विलंबाकरीता नमूद न करता दाखल केले आहे. प्रतिवादी यांना म्हणणे दाखल करण्याकरीता पूरेसा वेळ मिळूनही त्यांनी वेळेत म्हणणे व कैफियत दाखल केली नाही. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

४. दाव्यातील अभिलेख पाहिला असता असे दिसून येते की, सदर दाव्यात प्रतिवादी यांना समन्स लागू झाले आहेत. त्यानंतर प्रतिवादी हे दाव्यात हजर झाले. परंतू त्यांनी कैफियत व निशाणी ५ करीता म्हणणे दाखल केले नाही. सदर समन्स लागू झाले असल्याने नियमाप्रमाणे ९० दिवसांचा कालावधी संपला आहे.

परंतू सदरचे प्रकरण हे गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता व नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणे आवश्यक आहे. करीता अर्जातील नमूद कारण विचारात घेवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तसेच झालेल्या विलंबा करीता कॉस्ट लावणे न्यायोचित होईल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे-

## आदेश

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.३ यांनी रुपये २००/- इतकी कॉस्ट वादी यांना देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MRUNMAYEE M CHOUDHARY
Date: 2023.10.03 17:13:45 +0530

**ठिकाण - इचलकरंजी**
**दिनांक - ३०/०९/२०२३**

**(एम.एम.चौधरी )**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,**
**इचलकरंजी.**